## विश्रामगृह आरक्षण वापराबाबत नियमावली ( सभासदांच्या माहितीसाठी )

१) स्वप्नपूर्ती विश्रामगृहामध्ये फक्त सोसायटीच्या सभासदांना व त्यांच्या कुटुंबियांना राहता येईल. कुटुंब म्हणजे पत्नी, मुले व अवलंबीत आईवडील यांचा समावेश असेल. एका सभासदाला फक्त एकच रुम आरक्षित करता येईल.

२) विश्रामगृहामधील आरक्षण व इतर सर्व कामकाज सोसायटीच्या मुंबई कार्यालयातून कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत केले जाईल.

३) प्रथम आलेल्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर आरक्षण होईल. आरक्षण नाकारण्याचा पुर्ण अधिकार व्यवस्थापकीय मंडळाने राखून ठेवलेला आहे. या बाबतीत व्यवस्थापकीय मंडळाचा निर्णय अंतिम राहील.

४) विश्रामगृहात आरक्षण केलेल्या दिवसापेक्षा जास्त दिवस रहावयाचे असल्यास सोसायटीच्या मुंबई कार्यालयातून परवानगी घ्यावी लागेल. विश्रामगृहातील केअर टेकर कडून परस्पर मुदत वाढवून मिळणार नाही.

५) विश्रामगृह रुमचे राहण्याचे भाडे प्रत्येक दिवसासाठी लहान रुम रु.२५०/- व मोठा रुम रु.५००/- याप्रमाणे आरक्षण करण्यासाठी सोसायटीच्या कार्यालयात आगाऊ भरावयाचे आहेत.

६) आरक्षण करणाऱ्या सभासदाच्या एकुण भाड्याच्या २० टक्के व आरक्षण एक दिवस अगोदर रद्द केल्यास ५० टक्के रक्कम कपात केली जाईल. आरक्षण तारखेनंतर रद्द केल्याचे कळविल्यास कोणतीही रक्कम परत मिळणार नाही.

७) राहण्याचा दिवस सकाळी ९ ते दुसऱ्या दिवशी सकाळी ९ वाजेपर्यंत असेल. मुदत संपल्यानंतर रुम सभासदाने कोणत्याही परिस्थितीत सोडणे अनिवार्य आहे.

८) सभासदाने त्याच्या नावे असलेली रुम ताब्यात घेण्यासाठी व केअर टेकरच्या ताब्यात देण्यासाठी स्वत: हजर असणे आवश्यक आहे. सोबत कंपनीचे ओळखपत्र मागणीनुसार सादर करणे आवश्यक आहे.

९) सभासदाने आरक्षण केलेल्या रुममध्ये स्वतः राहणे आवश्यक आहे. आरक्षण अहस्तांतरणीय आहे.

१०) विश्रामगृह परिसरात स्वच्छता ठेवणे नितांत आवश्यक आहे.

११) विश्रामगृहामध्ये मद्य प्राशन, धुम्रपान करणे यास सक्त मनाई आहे. सभासद किंवा त्यांच्या कुटुंबियाकडून असे गैरवर्तन आढळून आल्यास सदर सभासदास तदनंतर या सुविधेचा लाभ देणे कायमचे बंद केले जाईल.

१२) सभासदांना विश्रामगृहात पाळीव प्राणी घेऊन येण्यास सक्त मनाई आहे.

१३) विश्रामगृहामधील विजेचा व पाण्याचा वापर आवश्यक असेल तेवढाच करावा. आवश्यकता नसल्यास विजेच्या उपकरणांची बटण बंद ठेवावीत.

१४) सभासदाने आपल्या वस्तुची काळजी स्वतः घ्यावी. सभासदाच्या झालेल्या नुकसानीबाबत तसेच भारनियमनास सोसायटी जबाबदार राहणार नाही.

१५) विश्रामगृहात रहात असताना कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास संबंधीत सभासदांच्या ( ज्यांच्या नावे आरक्षण आहे ) पगारातुन वळते करुन घेण्यात येईल.

१६) विश्रामगृहातील सोसायटीच्या मालमत्तेच्या देखरेखीसाठी केअर-टेकरची नियुक्ती केलेली असुन सभासद आपल्या वास्तव्याच्या कालावधीमध्ये त्याची गरज भासल्यास सोसायटीने नेमुन दिलेल्या कामासाठी त्याची मदत घेऊ शकतो.

१७) सोसायटीच्या कार्यालयामधून आरक्षण भाडे भरल्याची रितसर पावती मिळाल्यानंतरच आरक्षण गृहीत धरले जाईल.